# मुंबई विद्यापीठ

क्र. शिनिमावि(मशि)/ १२. /२०१८—२०१९

**परिपत्रक:—**

विषय: अल्पसंख्यांक महाविद्यालयातील शिक्षकांच्या आश्वासित प्रगती योजना (CAS) अंतर्गत कार्यवाही करण्याकरिता कुलगुरूंचे नामनिर्देशित सदस्य/विषयतज्ञांची नावे सुचित करणेबाबत

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व अल्पसंख्यांक महाविद्यालयातील पात्र शिक्षकांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत (CAS) संदर्भातील (स्टेज—१ ते स्टेज—२, स्टेज—२ ते स्टेज—३, स्टेज—३ ते स्टेज—४) हितलाभ देण्याकरीता शिक्षकांचे प्रस्ताव विद्यापीठास ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झाले आहेत. तसेच या संलग्नीत सर्व महाविद्यालयांच्या पात्र शिक्षकांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत (CAS) पदोन्नती प्रस्तावांवरही प्रथम प्राधान्याने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

तरी मुंबई विद्यापीठांतर्गत अल्पसंख्यांक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, पात्र शिक्षकांच्या आश्वासित प्रगती योजना (CAS) अंतर्गत प्रक्रीया करण्यासाठी शिक्षकांचे ऑनलाईन पध्दतीने छाननी/निवड/तज्ञ समिती गठीत करण्यासाठी विषयवार विषयतज्ञ/कुलगुरूंचे नामनिर्देशित सदस्यांकरिता पाच नावे ईमेल द्वारे विद्यापीठास एका आठवडयाच्या आत सादर करण्यात यावीत. सदर विषयतज्ञ व मा. कुलगुरूंचे प्रतिनिधी यांची एक संग्रहीत माहिती केली जाईल व सदर यादीतुन विद्यापीठाकडून विषयतज्ञ/कुलगुरूंचे प्रतिनिधी यांची निवड केली जाईल. सदर प्रक्रिया प्रकरणांचा जलद निपटारा होण्याच्या दृष्टीने करण्यात येणार आहे.

ईमेल आयडी :— concolsection@gmail.com

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :— २६-२-२०१९.

(दत्ता घुगे)
उपकुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत **अल्पसंख्यांक** महाविद्यालयातील प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.